**महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ**
**बोलीसाठी निमंत्रण**
**(स्थानिक स्पर्धात्मक निविदा)**

१.० पुणे जिल्हयातील तळेगाव दाभाडे येथील १४०० मे.वॅ. कंबाइंड सायकल पॉवर प्रोजेक्ट हया प्रस्तावित वीजनिर्मिती प्रकल्पाकरीता पर्यावरणावरील आघाताच्या निर्धारणाचा अभ्यास करुन पर्यावरणावरील आघाताचे सर्वसमावेशाक निर्धारण तयार करणे आणि त्याचा पर्यावरण विषयक निपटारा प्राप्त करणे हयाकरिता बोली मागवण्यात येत आहेत.

२.० <u>कामाचे स्वरुप</u> : प्रस्तावित प्रकल्पाकरीता अनुक्रमे एका ऋतुसाठी आणि तीन ऋतुसाठी तळरेषा आधार सामग्रीचा समावेश असलेले शीघ्र व सर्वसमावेशाक पर्यावरणावरील आघात निर्धारण अहवाल तयार करणे, ओळख, अनुमान व संचयी आघातांचे मूल्यमापन यांवर आधारित पर्यावरणावरील आघातांचे विवरणपत्र तयार करणे आणि पर्यावरण व्यवस्थापन योजना तयार करणे. प्रस्तावित अभ्यासात पुढील मुद्यांचा समावेश असेल:

एक) प्रकल्पाच्या ठिकाणापासून २५ कि.मी. अंतराच्या परिघातील मानवी हिताच्या मापनांचा समावेश करुन पर्यावरणातील हवा, ध्वनी , पाणी, जमीन इत्यादी जैविक व सामाजिक आर्थिक घटकांचे निर्धारण करणे.

दोन) प्रस्तावित प्रकल्पाच्या बांधकाम आणि संचालन या टप्प्यांत दृष्टीसमोर ठेवलेल्या कार्यांमुळे निरनिराळया पर्यावरण घटकांवर होऊ शकणारे संभाव्य आघात ओळखणे.

तीन) उचित गणिती / सिम्युलेशन मॉडेल्सचा उपयोग करुन महत्वाच्या पर्यावरण घटकांवर प्रस्तावित प्रकल्पामुळे होणा-या महत्वाच्या संचयी परिमाणांचे अनुमान काढणे.

चार) ओळख, अनुमान व संचयी आघातांचे मूल्यमापन यांवर आधारित पर्यावरणावरील आघातांची विवरणपत्र तयार करणे.

पाच) प्रस्तावित प्रकल्पाचे बांधकाम व संचालन टप्प्यांत पर्यावरणावरील प्रतिकूल परिणाम कमीतकमी व्हावेत म्हणून प्रतिबंधात्मक व नियंत्रक उपाय सुचविणा-या पर्यावरण व्यवस्थापन योजनेची रुपरेखा, योजनेचा खर्च व नियोजित कालबद्दता यांसह सादर करणे.

सहा) बांधकाम व संचालन या टप्प्यांत प्रस्तावकाने चालू ठेवावयाचा पर्यावरण विषयक गुणवत्ता नियंत्रण कार्यक्रम तयार करणे.

म.रा.वि. मंडळाच्या प्रस्तावित प्रकल्पाला पर्यावरण / प्रदूषण विषयक दृष्टीकोनातून निपटारा देण्याकरीता महाराष्ट्र प्रदूधण नियंत्रण मंडळ आणि महाराष्ट्र शासनाचा पर्यावरण विभाग / पर्यावरण आणि वन मंत्रालय यांनी आवश्यक केल्याप्रमाणे तपशीलवार पर्यावरणाचा अभ्यास वरील कामाच्या व्याप्तीत समाविष्ट केलेला आहे. हा अभ्यास वर्षभरातील उन्हाळा, हिवाळा आणि पावसाळा या तिन्ही ऋतुंकरीता करावयाचा आहे. आवश्यक निपटारे आणि पर्यावरण विषयक निपटारा प्राप्त

करण्याकरीता; प्रकल्पाच्या नमूद ठिकाणी केलेल्या अभ्यासाच्या आधारे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाराष्ट्र शासनाचा पर्यावरण विभाग / पर्यावरण आणि वन मंत्रालय, नवी दिल्ली, तसेच भारत सरकारातील अन्य कोणीही संबंधित यांच्या मागणीशी मिळताजुळता असेल असा, पर्यावरणावरील आघातांच्या निर्धारणासह असलेल्या पर्यावरणविषयक अभ्यासावरील तपशीलवार अहवाल बोलीदाराने तयार करुन द्यावा लागेल.

| | | |
|---|---|---|
| ३.० | बोली विनिर्देश क्र. | : सीई / सीई.एच.एस.यु./ १४०० मे.वॉ. प्रोजेक्ट//तळेगाव /ईआयए |
| | बोली दस्तऐवजांच्या एका संचाची किंमत | : रु. १०००/- ( ना परतावा ) |
| | बोली दस्तऐवज विक्रीचा कालावधी | : २० मे ते ४ जून २००५ |
| | बोलीपूर्व परिषद, ठिकाण व दिनांक | : १३ जून २००५ दुपारी २.३० वाजता |
| | बोली दस्तऐवज स्विकारण्याचा अंतिम दिनांक व वेळ | : २३ जून २००५ दुपारी १२.३० पर्यंत |
| | बोली उघडण्याचा नियोजित दिनांक आणि वेळ | : २३ जून २००५ दुपारी २.३० वाजता |

बोलीदारांनी आपापल्या बोली दोन लिफाफ्यांत सादर करावयाच्या आहेत. लिफाफा क्र.१ मध्ये तांत्रिक देकार,अर्हताकारी आवश्यकता, बोली प्रतिभुति/बंधपत्र, सर्वशर्ती व अटी यांचे निर्धारण यांचा समावेश असावा. लिफाफा क्र.२ मध्ये केवळ किंमत अनुसूची नमूद करावी.

४.० <u>अर्हताकारी आवश्यकता:</u>

जे बोलीदार खाली नमूद केलेल्या आवश्यकता बोली सोबत लेखी पुराव्यासहित पूर्ण करत असतील, ते बोलीमध्ये सहभागी होऊ शकतात.

क) बोलीदाराने मागील ५ आर्थिक वर्षात किमान २००/२१० मे.वॉट क्षमतेच्या किमान एका विद्युत निर्मिती सयंत्राकरीत एक वर्षाच्या कालावधीतील पर्यावरणावरील आघात निर्धारणाचा सर्वसमावेशक अभ्यास करुन अहवाल सादर केलेले असावेत. सदर अहवाल राज्य शासन/केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ/राज्य शासनाचा पर्यावरण विभाग/ पर्यावरण आणि वन मंत्रालय यांनी स्वीकृत केल्यानंतर संबंधित संयंत्र बोली उघडण्याचया दिनांकास यशस्वीपणे कार्यरत असले पाहिजे.

ख) बोलीदारास राज्य/केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ/राज्य/केंद्र शासनाचा पर्यावरण विभाग यांच्याकडील बाबी हाताळण्याचा / वैधानिक निपटारे प्राप्त करण्याचा अनुभव असावा आणि राज्य/केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ/राज्य शासन/केंद्र शासन यांचे विभाग या समोर तसेच सार्वजनिक सुनावणी प्रसंगी सादरीकरण करण्यास तो सक्षम असावा. ग्राहकांच्या वतीने शासकीय विभागाकडून सर्व वैधानिक निपटारे प्राप्त करण्यास बोलीदार सक्षम असावा.

ज) पर्यावरणावरील आघातांच्या निर्धारण अभ्यासाकरिता कामाच्या ठिकाणावरुन निरनिराळया प्रकारच्या मोजण्या/आधारसामग्री यांसाठी बोलीदाराकडे स्वत:ची सिध्द प्रयोगशाळा असावी. याबाबतचे दस्तऐवज तांत्रिक बोलीसोबत असावेत.

५.० बोलीदारांस अर्हताकारी आवश्यकतांबाबत सूचना:

१) बोलीदाराने बोलीसोबत लेखी पुराव्यानिशी अर्हता आधारसामग्री सादर केली पाहिजे.

२) प्रस्तुत बोलीच्या वैधता कालावधीत बोलीदाराचा मालकीमध्ये कोणताही बदल करण्याचा मानस नसला पाहिजे (जर असा बदल करण्याचा उद्देश असेल तर त्याची नेमकी व्याप्ती आणि परिणाम निश्चित करावा लागेल ).

३) बोलीदाराची अर्हता त्याने सादर केलेल्या माहितीवर आधारीत असेल. तथापि संपूर्ण तांत्रिक तपशील आणि दिलेली माहिती पडताळून पाहण्याचा अधिकार म.रा.वि.मंडळास असेल. अशा प्रसंगी बोलीमध्ये नमूद केलेली माहिती खोटी असल्याचे आढळून आल्यास बोली फेटाळण्यात येईल याची बोलीदाराने नोंद घ्यावी.

६.० बोलीदाराने बोलीसोबत भारतीय रुपये पन्नास हजार मूल्यासमान रकमेची बोली प्रतिभूती सादर करावी. बोली प्रतिभूतीची वैधता बोलीतील लिफाफा क्र.१ उघडण्याच्या दिनांकापासून २१० दिवसांपर्यत असावी.विविध नमुन्यात नसलेल्या बोलींबाबत बोली प्रतिभूती नाकारण्यात येईल. बोली उघडण्याच्या (लिफाफा क्र.१ उघडल्या दिनांका पासून किमान १८० दिवसांपर्यंत बोलीदारास त्याचा देकार स्वीकृतीसाठी वैध ठेवावा लागेल).

७.० बोलीदारास कंत्राट दिले गेल्यास त्याने कंत्राट किंमतीच्या १० टक्के मुल्यासमान रकमेची कंत्राट कामगीरी प्रतिभूती सादर केली पाहिजे.

८.० स्वारस्य असणारे पात्र बोलीदार बोली दस्तऐवज, त्यांसाठी बोलीदाराच्या संपूर्ण टपाल पत्त्यासह असलेले मागणीपत्र मुख्य अभियंता (पर्यावरण, आरोग्य आणि सुरक्षितता ) तिसरा मजला, प्रकाशगड यांना सादर करुन मुख्य लेखा अधिकारी , म.रा.वि.मंडळ,मुंबई यांना देय होणारी विनिर्दिष्ट रक्कम रेखित दर्शनी धनाकर्षाव्दारा प्रदान करुन आणि रोखीची पावती मुख्य अभियंता (पर्यावरण) यांना सादर करुन कामाच्या कोणत्याही दिवशी दुपारी २.०० ते ४.०० या वेळात प्राप्त करु शकतील. बोलीदार त्याच्यावतीने बोली दस्तऐवज नेण्यास कोणास प्राधिकृत करु इच्छित असल्यास बोली दस्तऐवज मागणीपत्रासोबत बोलीदाराने दिलेले. उचित प्राधिकार पत्र सादर केले पाहिजे. बोली दस्तऐवज पोस्टाने/कुरियरव्दारा मागवल्यास ते नोंदणीकृत डाकेने पाठविण्यात येतील. पोस्टाकडून होणाऱ्या विलंबाबद्दल मंडळ जबाबदार राहणार नाही.

९.० कोणतेही कारण ने देता एवादी किंवा सर्व बोली फेटाळण्याचा अधिकार मंडळ राखून ठेवीत आहे.

मुख्य अभियंता ( सौ.प.आ. व सु )

दूरध्वनी : २६४७४२११
फॅक्स : २६४७५३२९